दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक २१३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● गुरुवार दि.२८ ऑक्टोबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com


दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

### राज्य सरकारचा मोठा निर्णय...

## महानगरपालिका, नगरपरिषदांमधील सदस्य संख्येत होणार वाढ

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषदांमधील निर्वाचित सदस्यांच्या संख्येत वाढ करण्यात आली आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत आज हा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. झपाट्याने वाढलेली लोकसंख्या तसंच नागरी विकास योजनांचा वेग वाढवण्याची गरज लक्षात घेऊन महानगरपालिका व नगरपरिषदांमधील निर्वाचित सदस्यांच्या संख्येमध्ये वाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला.



२०११ च्या जनगणनेच्या आकडेवारीच्या आधारावर महानगरपालिका व नगरपरिषदांमधील सदस्य संख्या निर्धारित आहे. कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे २०२१ च्या जनगणनेचे निष्कर्ष अप्राप्त आहेत. त्यास आणखी काही कालावधी लागणार आहे. या कालावधीत लोकसंख्या वाढीचा सरासरी वेग गृहित धरुन अधिनियमात नमुद केलेल्या महानगरपालिका व नगरपरिषदांच्या किमान सदस्य संख्येत १७ टक्के इतकी वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. किमान सदस्य संख्या वाढवल्यामुळे पुढील सदस्य संख्या देखील वाढेल व त्यामुळे पर्याप्त सदस्य संख्या निश्चित होईल.

महानगरपालिकांमध्ये ३ लाखापेक्षा अधिक व ६ लाखापर्यंत लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या ७६ व अधिकतम संख्या ९६ पेक्षा अधिक नसेल. ६ लाखापेक्षा अधिक व १२ लाखांपर्यंत लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या ९६ व अधिकत्तम संख्या १२६ पेक्षा अधिक नसेल. १२ लाखापेक्षा अधिक व १४ लाखापर्यंत लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या १२६ व अधिकत्तम संख्या १५६ पेक्षा अधिक नसेल.

२४ लाखापेक्षा अधिक व ३० लाखापर्यंत लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या १५६ व अधिकत्तम संख्या १६८ पेक्षा अधिक नसेल. ३० लाखापेक्षा अधिक लोकसंख्येसाठी निवडून आलेल्या पालिका सदस्यांची किमान संख्या १६८ व अधिकत्तम संख्या १८५ पेक्षा अधिक नसेल.

दरम्यान, अ वर्ग नगरपरिषदांमध्ये निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या ४० व अधिक संख्या ७५ हून अधिक नसेल. ब वर्ग नगरपरिषदांमध्ये निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या २५ व अधिक संख्या ३७ हून अधिक नसेल. क वर्ग नगरपरिषदांमध्ये निवडून आलेल्या परिषद सदस्यांची किमान संख्या २० व अधिक संख्या २५ हून अधिक नसेल.

### संक्षिप्त...

## समीर वानखेडेंच्या जीवाला धोका, केंद्रानं दिली झेड प्लस सुरक्षा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

एनसीबीचे विभागीय संचालक समीर वानखेडे सध्या चांगलेच चर्चेत आहेत. राज्याचे कॅबिनेटमंत्री नवाब मलिकांना यांनी थेट जाहीर सभेतून समीर वानखेडे लवकरच तुरुंगात जातील, असे म्हटले. त्यानंतर, वानखेडे आणि मलिक यांच्यातील शाब्दीक संघर्ष टोकाला पोहोचला आहे. त्यातच, वानखेडे कुटुंबातील सदस्यांनी आम्हाला जीवे मारण्याच्या धमक्या येत असल्याचे म्हटले होते. तर, समीर वानखेडे यांच्या जीवाला धोका असल्याचेही सांगण्यात येत. त्यामुळे, केंद्रीय गृहमंत्रालयाने समीर वानखेडे यांच्या सुरक्षेत वाढ केली आहे.

समीर यांच्या सुरक्षेमध्ये वाढ करण्याचा निर्णय गृहमंत्रालयाने घेतला असून त्यांना झेड प्लस सुरक्षा देण्यात येईल. मुंबईत कॉर्टेलिया क्रूजवर २ ऑक्टोबर रोजी त्यांनी केलेल्या कारवाईवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे. या पार्श्वभूमीवर समीर वानखेडे यांच्या सुरक्षेमध्ये वाढ करण्यात आल्याचं बोललं जात आहे.

दरम्यान, क्रुझवरील ड्रग्ज प्रकरणात आर्यन खानला अटक केल्यापासून छ्उइ च्या कारवाईवर राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री नवाब मलिक यांनी प्रश्नचिन्ह उभे केले आहेत. क्रुझवर उपस्थित असणाऱ्या बड्या ड्रग्ज माफियाला समीर वानखेडे यांनी सोडून दिलं असा दावा मलिकांनी केला आहे. मलिक हे सातत्याने समीर वानखेडे यांच्यावर टीकास्त्र सोडत आहेत. त्यामुळे, वानखेडे कुटुंबीयही मैदानात उतरले असून पत्नी क्रांती रेडकर यांनी नवाब मलिक यांना इशाराच दिला आहे.

## छत्रपती संभाजीराजे यांचे आ.प्रशांत ठाकूर यांनी पनवेल नगरीमध्ये केले स्वागत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

उच्च न्यायालयाने मराठा आरक्षण नाकारल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांचे १३ वंशज छत्रपती संभाजीराजे यांनी मराठा समाजाला एकसंघ करण्यासाठी रायगड जिल्ह्यात जनसंवाद यात्रा मंगळवारी आयोजीत करण्यात आली होती. या यात्रेचा सामरोप पनवेल मध्ये झाला. या वेळी छत्रपती संभाजीराजे यांचे भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल नगरीमध्ये मध्ये स्वागत केले. यावेळी आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झालेल्या सभेत मराठा आरक्षणासाठी लाँग मार्च काढला जाईल असा इशारा संभाजीराजे यांनी राज्य शासनाला दिला.

सुप्रीम कोर्टाने मराठा समाजाला आरक्षण देता येणार नाही असा निकाल दिल्यानंतर पुन्हा या लढ्याला सुरुवात कारावी तसेच मराठा समाजाला एकसंघ करण्यासाठी रायगडच्या पवित्र भुमीमधून छत्रपती संभाजीराजे यांची जनसंवाद यात्रा मंगळवारी आयोजीत करण्यात आली होती. या



यात्रेचा समारोप पनवेल शहरामध्ये झाला. यावेळी छत्रपती संभाजीराजे यांनी पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन त्यांना अभिवादन केले.

या वेळी पनवेल महापालिकेच्या महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृहनेते परेश ठाकूर, मराठा समाज राज्य समन्वयक विनोद साबळे, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, युवामोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युवानेते हॅप्पी सिंग, कामोठे युवामोर्चा अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, जिल्हा सरचिटणीस चिन्मय समेळ, युवामोर्चा पनवेल शहर अध्यक्ष रोहित जगताप, यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाअंतर्गत आद्य क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी छत्रपती संभाजीराजे यांनी सांगीतले की, दुःखी असलेल्या समाजासाठी हा लढा सुरु आहे. त्यामुळे मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मुंबई ते पुणे या मार्गावर लाँगमार्च काढणार असेही त्यांनी यावेळी जाहिर केले.

## फेसबुकवरुन मैत्री करून घातला ६ लाख ६९ हजाराला महिलेला गंडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

फेसबुकवरुन मैत्री करून त्यानंतर मोबाईल क्रमांकावरुन संपर्क साधून आपण इंग्लड येथे राहत असून तुमच्याकरिता सोन्याच्या बांगड्या, अंगठी, लॅपटॉप, पर्स, कपडे पाठविले आहेत. ते पार्सल दिल्ली येथे अडकले आहे असे सांगून त्याकरिता खात्यामध्ये ६ लाख ६९ हजार जमा करा असे सांगून एका महिलेची फसवणूक केल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

नवीन पनवेलमध्ये राहणाऱ्या एका महिलेची टॉनी माईक याच्याशी फेसबुकवरुन मैत्री झाली. यावेळी त्याने सदर महिलेचा मोबाईल क्रमांक घेवून वेगवेगळ्या मोबाईल क्रमांकावरुन तिच्याशी संपर्क साधून तो इंग्लड येथे राहत असल्याचे खोटे सांगून त्यांच्याकरिता ३ लाख रुपये व सोन्याच्या बांगड्या, अंगठी, लॅपटॉप, पर्स, कपडे आहेत. ते पार्सल दिल्ली येथे अडकले आहे असे सांगून त्याकरिता खात्यामध्ये ६ लाख ६९ हजार जमा करा असे सांगून सदर महिलेकडून वेगवेगळ्या खाते क्रमांकामध्ये पैसे वळते करून घेवून त्यांच्या रक्कमेचा अपहार केल्याने याबाबतची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## खारेपाटातील अन्यायकारक वाढीव पाणी पट्टीची नागरिकांनी केली होळी



**दै.रायगड नगरी । पेण**

पेण तालुक्यातील ग्रामीण खारेपाट विभागाला पिण्याचे पाणी मिळत तर नाहीच उलट १२०० रुपये आकारण्यात आलेले पाणीपट्टी अन्याय कारक असून त्यात पुन्हा वाढ करून ती २२०० रुपये केल्याने खारेपाट नागरिकांनी संताप व्यक्त केला असून त्याच्या निषेधार्थ ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालयासमोर पाणी पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन देऊन पाणीपट्टी नोटिशीची होळी करून निषेध करण्यात आला.

यावेळी जि प सदस्य प्रभाकर म्हात्रे, काँग्रेस तालुकाध्यक्ष अशोक मोकल, वाशी सरपंच गोरख पाटील, वढाव सरपंच पूजा पाटील, नंदा म्हात्रे, खारेपाट विकास संकल्प संघटना अध्यक्ष प्रकाश माळी, हेमंत पाटील, जिल्हा नियोजन समिती सदस्य प्रसाद पाटील , सी आर म्हात्रे, राजन झेमसे, अशोक मढवी, केशव काळे, विजय ठाकूर, संदेश ठाकूर, मोहिनी गोरे, धीरज पाटील ,संदीप पाटील, रविकांत म्हात्रे तसेच पेण खारेपाट विभागातील शेकडो नागरिक उपस्थित होते. रायगड जिल्हा परिषदेने शहापाडा ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सार्वजनिक तसेच खाजगी नळ कनेक्शन

.../२

## जुन्या राष्ट्रीय पेन्शन योजनेसाठी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांचे ठिय्या आंदोलन



**दै.रायगड नगरी । कळंबोली**

सरकारने २००५ पासून लागू केलेल्या नवीन अंशदायी योजने विरोधात राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना रायगड जिल्ह्याच्या वतीने सर्वांना जुनी पेन्शन योजना लागू करावी या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहे. जुन्या राष्ट्रीय पेन्शन योजनेसाठी राज्य सरकारी कर्मचाऱ्यांनी बुधवारी सकाळी पनवेल तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. यावेळी तहसीलदार यांना निवेदन देऊन शासनाकडे जुन्या राष्ट्रीय पेन्शन योजनेची अंमलबजावणी करण्याची मागणी या वेळी करण्यात आली.

सर्व परिभाषित अंशदान पेन्शन योजना (एन पी एस) धारक कर्मचारी यांच्या या जिव्हाळ्याच्या मागणीकरिता सन २००५ पासून सरकारने लागू केलेल्या अंशदायी पेन्शन योजनेच्या विरुद्ध सरकारी कर्मचाऱ्यांनी विविध मार्गांनी आंदोलने करून नवीन पेन्शन योजने तिला आपला विरोध दर्शविला आहे. दिनांक ८,९ व ११० ऑगस्ट २०१८ रोजी सरकारी कर्मचाऱ्यांनी तीन दिवसाचा संप करण्यात आला केला. केलेल्या संपाची फलनिष्पत्ती म्हणून सातवा वेतन आयोग, पाच दिवसाचा आठवडा व एनपीएस करीता पेन्शन बाबत अभ्यास गट तयार करण्यात आला या अभ्यास गटाची पहिली बैठक नुकतीच पार पडली. मात्र जुन्या पेन्शनसाठीचे सुरू केलेले आंदोलन जुनी पेन्शन योजना लागू होईपर्यंत सरकारी कर्मचारी मागे हटणार नाही असा पवित्रा घेऊन शुक्रवार दिनांक २९ऑक्टोबर २०२१ रोजी राज्यभरातील सरकारी कार्यालयासमोर सकाळच्या सत्रात एक तास राज्यव्यापी आंदोलन करण्यात येणार असल्याचे राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटना रायगड च्या वतीने सांगण्यात आले आहे. पनवेल तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी रायगड सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सरचिटणीस प्रभाकर नाईक यांच्या नेतृत्वाखाली व पनवेल तालुका अध्यक्ष आर.व्ही शिरसाट यांच्या बरोबर सर्व कर्मचाऱ्यांनी नायब तहसीलदार श्री संजीव मांडे यांच्याकडे याबाबतचे निवेदन सोमवारी सादर केले.

या निवेदनात एनपीएस योजना रद्द करून जुनी परिभाषित पेन्शन योजना सर्वांना लागू करा, देशभरातील अनेक राज्यांनी जुनी पेन्शन योजना सर्वांना लागू करावी अशा शिफारसी तेथील विधानसभा ठरावाद्वारे केंद्र शासनाकडे केल्या आहेत तशी महाराष्ट्र शासनाने तात्काळ करावी, केंद्रीय कर्मचाऱ्यांना प्रमाणे एन पी एस कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेले सर्व लाभ राज्यातील कर्मचाऱ्यांना मिळावेत, राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना १०% शासन अंशदान ऐवजी १४% अंशदान रकमेची वजावट आयकरसाठी एकूण उत्पन्नातून अनुज्ञेय करण्यात यावी, पूर्वीच्या सेवेचा राजीनामा देऊन १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नवीन सेवा स्वीकारलेल्या तसेच नोव्हेंबर २००५पूर्वी निवड झालेल्या परंतु उशिरा नियुक्ती आदेश मिळालेल्या कर्मचाऱ्यांना परिभाषित पेन्शन योजना लागू करावी अशा मागण्या प्रामुख्याने या निवेदनाद्वारे केल्या आहेत.

## उल्हासनगरमध्ये मोठी राजकीय उलथापालथ; कलानी कुटुंबासह २१ नगरसेवक राष्ट्रवादीत

**दै.रायगड नगरी । उल्हासनगर**

उल्हासनगरमध्ये मोठी राजकीय उलथापालथ झाली आहे. उल्हासनगर शहरात व महापालिकेत राजकीय वर्चस्व असलेल्या कलानी कुटुंबीयांनी पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. माजी महापौर पंचम कलानी यांच्यासोबतच पप्पू कलानी यांची मुलगी सीमा कलानी व २१ नगरसेवकांनी राष्ट्रवादी काँग्रेसचं घड्याळ हाती बांधलं आहे.

राज्याचे गृहनिर्माण मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्या उपस्थितीत आज हा सोहळा पार पडला. पंचम कलानी यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या उल्हासनगर शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील हे नुकतेच ठाणे दौऱ्यावर येऊन गेले. या दौऱ्या दरम्यान त्यांची पॅरोलवर बाहेर असलेल्या पप्पू कलानी व अन्य नेत्यांसोबत चर्चा झाली होती. तेव्हाच कलानी



कुटुंबाची घरवापसी निश्चित झाली होती.

पप्पू कलानी यांचे चिरंजीव ओमी कलानी हे सध्या राजकारणात सक्रिय आहेत. कलानी यांच्या पक्षानं आजवर अनेक पक्षांशी आघाडी करत स्थानिक राजकारणात आपलं वर्चस्व

.../२

## मंत्री गुलाबराव पाटील यांचा रायगड जिल्हा दौरा

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांचा जिल्हा दौरा खालीलप्रमाणे-

गुरुवार दि.२८ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी ७.०० वा. शासकीय निवासस्थान क-१ मंत्रालय येथून गेट वे ऑफ इंडिया, मुंबईकडे प्रयाण. सकाळी ७.१० वा. गेट वे ऑफ इंडिया,मुंबई येथून स्पीड बोटीने मांडवा, अलिबागकडे प्रयाण. सकाळी ७.३० वा. मांडवा येथे आगमन व शासकीय वाहनाने माणगावकडे प्रयाण. सकाळी ८.३० वा. शासकीय विश्रामगृह माणगाव येथे आगमन व राखीव. सकाळी ९.१५ वा. शासकीय विश्रामगृह माणगाव येथे कार्यकर्त्यांच्या भेटी व चर्चा. सकाळी ९.४५ वा. माणगाव मांगरूळ ता.माणगावकडे प्रयाण. सकाळी १०.०० वा. मांगरूळ येथे आगमन व मांगरूळ ग्रामीण पाणीपुरवठा योजनेच्या भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी १०.३० वा. मांगरूळ येथून

.../२

# इंद्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा

केंद्रातील व येथील सत्ताधारी, विविध तपास व इतर यंत्रणा, नोकरशाहीतील अनेक अधिकारी, दोन्हीकडचे विरोधक आणि या दोन्ही बाजूंनी उभे राहणारे बाजारबुणगे; तसेच माशासारखे सर्वत्र सहजी पोहणारे अट्टल फिक्सर्स यांचा जो अभूतपूर्व खेळ, उर्फ नंगानाच गेले अनेक महिने महाराष्ट्रात चालू आहे; त्याचे नवनवीन अध्याय सामान्य माणसाला चकित करून टाकणारे आहेत. कलाजगत, गुन्हेगारी, राजकारण आणि तपास यंत्रणा यांचा किती भयंकर गुंता महाराष्ट्रात होऊन बसला आहे, याचा शाहरूख खानचा मुलगा आर्यन व त्याच्या इतर सवंगड्यांना झालेली अटक हा छोटासा मासला आहे. अशा प्रकरणांमध्ये नेहमीच आरोप–प्रत्यारोप सुरू होतात व त्यांचे वेगाने राजकियीकरण होते. याचे मुख्य कारण, देशातली एकही तपास यंत्रणा स्वायत्त आणि भ्रष्टाचारापासून मुक्त नाही. राज्य सरकारमधील राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री नवाब मलिक यांनी नार्कोटिक्स कंट्रोल ब्यूरो (एनसीबी), मुंबईचे संचालक समीर वानखेडे यांच्यावर जे आरोप केले किंवा जी कागदपत्रे समाजासमोर ठेवली; त्यांची योग्य त्या यंत्रणा तड लावतील, अशी अपेक्षा आहे. ही कागदपत्रे घटकाभर खरी मानली, तरी समुद्रात क्रूझवर जी पार्टी झाली, तीत बंदी असणाऱ्या अमली पदार्थांचा वापर झाला की नाही, हा प्रश्न राहतो. आपले काहीही मतभेद असले, तरी अमली पदार्थांचा वाढता वापर हा आपला खरा शत्रू आहे आणि तरुणांना वाचविण्यासाठी या चोरट्या व्यापाराचा बीमोड व्हायला हवा, अशी भूमिका खरे तर सगळ्यांनी मिळून घ्यायला हवी; मात्र असे 'रामराज्य' फक्त स्वप्नात दिसू शकते. प्रत्यक्षात, प्रत्येक तपास, प्रत्येक प्रकरण, प्रत्येक संशयिताची अटक, प्रत्येक नवे प्रतिज्ञापत्र आणि संशयितांचे फरारी किंवा बेपत्ता असणे या साऱ्याचा राजकीय प्रतिस्पर्ध्यांवर मात करण्यासाठी कसा वापर करता येईल, याचेच हिशेब अहोरात्र मांडले जात आहेत. आर्यन खानचे प्रकरण सुटे पाहता येत नाही. ते बॉलिवूड; तसेच उच्चभ्रू तरुणाईला पडलेला अमली पदार्थांचा विळखा, सुशांतसिंह राजपूतचा मृत्यू, मुंबई पोलिस दलातील लाजिरवाणी गुन्हेगारी, काही राजीनामे या साऱ्यांशी जोडलेले आहे. आर्यन खानचे प्रकरण चालू असतानाच केंद्रीय समाज कल्याण खात्याने काही काळापूर्वी जारी केलेल्या 'अमली पदार्थ घेणाऱ्या तरुणांकडे गुन्हेगार म्हणून न पाहता (या व्यसनाचे) बळी म्हणून पाहायला हवे,' या मार्गदर्शक सूचनांची अचानक बातमी व्हावी आणि त्याच वेळी, मुंबई उच्च न्यायालयात आर्यनची बाजू मांडताना ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनीही हीच बातमी उचलून धरावी, हा केवढा योगायोग आहे. यात अमली पदार्थांचा एकूण व्यापार व धोका हा मुद्दा बाजूला पडून आर्यनचा कोठडीतला वाढता मुक्काम, नवाब मलिक आणि वानखेडे यांचा वाद व वानखेडे यांचे व्यक्तिगत आयुष्य हाच 'फोकस' होऊन बसला आहे. ज्यांचे जवळचे नातलग अमली पदार्थांच्या प्रकरणात कोठडीत आहेत, त्यांना अशा प्रकरणांत वर तोंड करून बोलण्याचा कितपत नैतिक अधिकार आहे, याचा विचार त्यांच्या बोलवित्या धन्यांनी करायला हवा; पण दाखविण्यापुरती किंवा ढोंग करण्याइतकीही नैतिकता ठेवायची नाही, असा निर्धारच जणू सगळ्या राजकीय पक्षांनी केला आहे. त्यामुळे, केंद्रीय यंत्रणांचे अधिकारी विरुद्ध राज्यातील सत्ताधारी किंवा उलट, असे चित्र महाराष्ट्रात वारंवार दिसू लागले आहे. लोकशाहीच्या स्तंभांवर भाषणे ठोकणे सोपे असते; पण या साऱ्यातून सगळे स्तंभ अक्षरशः खिळखिळे होत आहेत. देशात एका तरी महानगराचा पोलिस आयुक्त काही काळाने थेट 'संशयित आणि फरारी' या श्रेणीत जाऊन बसतो, असे या आधी कधी झाले आहे का? परमबीरसिंह यांना जे लपवून ठेवत आहेत किंवा संरक्षण देत आहेत, ते मोठाच गुन्हा करीत आहेत, यात शंका नाही. या साऱ्यातून एक अतिशय वेगळा; पण लोकहिताचा मुद्दा पुढे येतो. तो म्हणजे, महाराष्ट्रातले सत्तेचे समीकरण आज आहे तसे नसते, तर इतक्या कारवाया, इतक्या धाडी, इतके खटले, इतके तपास आणि इतक्या अटका असा सारा अराजकसदृश वातावरण निर्माण करणारा माहोल तयार झाला असता का? याचा अर्थ, सगळ्या तपास यंत्रणा ही व्यवस्था किंवा भ्रष्टाचार साफ व्हावा म्हणून काम करीत नसून त्या एक 'राजकीय हत्यार' बनल्या आहेत. नेमकी तीच भाषा दुसरेही वापरत आहेत. या लढाईतून आजचे अराजक अवतरले आहे. जनमेजय राजाने सर्पसत्र हा यज्ञ केला तेव्हा, तक्षक हा नागराज इंद्राच्या पाठी दडला. तेव्हा, तक्षकाचा बळी द्यायचा असेल तर पाठीराख्या इंद्राचाही बळी द्या, असा 'इंद्राय स्वाहा, तक्षकाय स्वाहा' असा मंत्र म्हणण्यात आला. महाराष्ट्रात अशा तक्षक आणि इंद्रांनी सध्या धुमाकूळ घातला आहे.

# भूषण पाटील, सुरेश पाटील यांच्या प्रयत्नाने महिलेला मिळाला न्याय ; नोकरीवर झाली कायमची नेमणूक



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील जसखार गावातील महिला दिपाली घरत हिला तिच्या पतीच्या मृत्यू नंतर नोकरीची गरज असताना Fassai lab चे renovation चालू असताना हाऊस किपिंग म्हणून तात्पुरत्या स्वरूपात तिथे काम मिळाले. FASS-I ही लॅब उरण तालुक्यातील जसखार गावच्या हद्दीत असून ज्यावेळेस त्या लॅब चे काम पूर्ण झाले,त्यानंतर लगेच दिपाली घरत हिला तिथल्या अधिकाऱ्यांनी नोकरीवरून काढून टाकले. त्यावेळेस कुठल्याही क्षणाचा विलंब न करता जनविकास महिला संस्थेच्या अध्यक्ष कविता ठाकूर आणि सदस्य त्वरित Fassai लॅबमध्ये जावून लॅबच्या इन्चार्ज धनिया मॅडम सोबत चर्चा करून दीपाली यांना कामावर घेण्याची मागणी केली.

महिला संस्थेच्या विनंतीला मान देवून एका आठवड्यात कामावर घेतो असे लॅबच्या धनिया मॅडम कडून सांगण्यात आले. आठवड्या नंतर दिपाली घरत हिला कामावर रूजू केल्यानंतर दोन महिन्यात पून्हा दिपाली घरत हिला तिथल्या अधिकाऱ्यांनी नोकरीवरून काढून टाकले.

हे कृत्य दिपाली घरत हिने महिला संस्थेच्या निदर्शनास आणले त्यानंतर महिला संस्थेच्या अध्यक्ष आणि सदस्यांनी जनविकास महिला संस्थेचे सल्लागार कामगार नेते तथा जे एन पी टी विश्वस्त भूषण पाटील आणि कामगार नेते सुरेश पाटील यांची भेट घेऊन सदर समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिली. जनविकास महिला संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी FSSAI च्या अधिकाऱ्यांना घेराव घातला. तसेच भुषण पाटील यांनी प्रकल्पग्रस्त कामगार कायदेविषयक चांगलेच ज्ञान देऊन तिथल्या अधिकाऱ्यांना धारेवर धरले. ह्याचा परिणाम म्हणजे FASS-I च्या अधिकाऱ्यांनी दिपाली घरत यांना ताबडतोब कामावर घेतले. आणि कायमस्वरूपी नोकरीत समावेश करण्याचे मान्य केले. या सर्वांच्या प्रयत्नाला यश आले असून एका गरीब महिलेला न्याय मिळाल्याने दीपाली घरत हिला मदत करणाऱ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. पतीच्या निधनानंतर दोन मुले असलेल्या दीपाली घरतने नोकरी करत आपला संसार सांभाळला. मात्र मध्येच नोकरी वरून काढून टाकल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली होती. घरात कमावता, कर्ता पुरुष कोणीच नसल्याने त्या चिंताग्रस्त झाल्या होत्या मात्र सर्वांच्या मदतीने त्यांना परत कामावर घेतल्याने त्यांनी समाधान व्यक्त करत सर्वांचे आभार मानले आहे.

# कोशिश फाऊंडेशनच्या वतीने 'पोस्टर तसेच ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा' भरघोस बक्षिसे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दीपावलीचे औचित्य साधून कोशिश फाऊंडेशनच्या वतीने 'पोस्टर स्पर्धा तसेच ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे.

या दोन्ही स्पर्धा पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील रहिवाश्यांसाठी आहेत. ७ वर्षाखालील, ८ ते १५ वर्षे, १६ ते २१ वर्षे, तसेच २२ वर्षावरील अशा चार गटात या स्पर्धा होणार असून 'ध्वनी प्रदूषण', 'ये दिवाळी शांतीवाली' आणि 'वोकल फॉर लोकल', हे तीन विषय या स्पर्धेसाठी आहेत.

स्पर्धेत नाव नोंदणीची अंतिम तारीख १० नोव्हेंबर असून अधिक माहितीसाठी ७७५७०००००० या क्रमांकावर संपर्क साधावा. पोस्टर स्पर्धेतीत एकूण विजेत्यांना ३५ हजार तसेच ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेतील एकूण विजेत्यांना ३५ हजार रुपयांची पारितोषिके देण्यात येणार असून या स्पर्धेचा जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन महानगरपालिकेचे सभागृहनेते व कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष परेश ठाकूर यांनी केले आहे.

# नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना नागोठणे पोलिसांचे मार्गदर्शन

## महिलांविषयक अत्याचार, सायबर क्राईम विषयी जनजागृती



**दै.रायगड नगरी । वाकण**

नागोठणे पोलिस ठाण्यात रूजू झाल्यापासून एक गाव, एक पोलिस असे स्तुत्य व अभिनव उपक्रम राबविण्याची सुरुवात करणारे नागोठणे पोलिस ठाण्याचे पोलिस निरिक्षक तानाजी नारनवर यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिस ठाण्याच्या हद्दीत अनेक उपक्रम राबविले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींशी संवाद साधून जनजागृती करण्याचे काम नागोठणे पोलिस ठाण्यातील अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून करण्यात आले.

नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या सहकार्याने मंगळवार दि. २६ ऑक्टोबर रोजी सकाळी ११.३० ते दुपारी १.०० वाजण्याच्या सुमारास संपन्न झालेल्या या कार्यक्रमात नागोठणे पोलिस ठाण्यातील पोलिस उपनिरिक्षक अरुण भिसे व पोलिस ठाणे अंमलदार यांच्याकडून महिला सक्षमीकरण, महिलांविषयक अत्याचार, गुड टच व बॅड टच, सायबर क्राईम व अन्य विविध विषयांवर विद्यार्थिनींना मार्गदर्शन करीत जनजागृती करण्याचे बहुमूल्य काम केले. त्याचबरोबर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांनाही सायबर क्राईम, वाहतूक व्यवस्था, दहशतवाद, पोलीस विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या पोलीस काका / पोलीस दिदी या संकल्पनेची माहिती दिली.

या कार्यक्रमाला नागोठणे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य श्रीमती प्रतिभा चव्हाण, प्रभारी गट निदेशक नवनीत पाटील, पोलिस उपनिरिक्षक अरुण भिसे, सहाय्यक पोलिस उपनिरिक्षक राजश्री टीवरे, पोलिस हवालदार प्रमोद कदम, पोलिस हवालदार विनोद पाटील, महिला पोलिस शिपाई नम्रता आयर, संगणक शाखेचे निदेशक रामधन नखाते, एओसीपी व्यवसायाचे निदेशक संदीप शिंदे, फिटर व्यवसायाचे निदेशक सूर्यकांत बारगोडे, वरिष्ठ लेखनिक संग्राम नरळे आदींसह औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सुमारे २५० प्रशिक्षणार्थी यावेळी उपस्थित होते.

# पनवेल परिसरातील प्रभाग १९ मधील विविध ठिकाणच्या हायमॅक्स पथदिव्याचे उद्घाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

प्रभाग क्रमांक १९ मध्ये गुणे हॉस्पिटल, भाजी मार्केट तसेच टपाल नाका येथे काही दिवसांपूर्वी नगरसेवक राजु सोनी यांच्या नगरसेवक निधीतून हाय माक्स पथदिवे बसविण्यात आले होते. याचे उदघाटन सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आले.

त्यावेळी डॉ.गिरीश गुणे यांच्या हस्ते उदघाटन करुन त्यांच्या हस्ते हे हाय माक्स दिवे चालू करण्यात आले.त्यावेळी येथे नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, प्रभाग क्रमांक १९ चे अध्यक्ष पवन सोनी, डॉ. गिरीश गुणे, चंद्रकांत मंजुळे, राजू कोळी, मंदार देसाई, तुषार कापरे, अरुण मालपाणी, सुनील खळदे, प्रशांत गायकवाड, सुभाष पवार ,आधी कार्यकर्ते, तसेच महानगरपालिकेचे अधिकारी प्रितम पाटील व त्यांचे सहकारी उपस्थित होते.

# दिशा महिला मंच आयोजित संकल्प नेत्रदान उपक्रम संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिशा महिला मंच आयोजित लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या सहकार्याने श्रद्धा अकॅडेमी कामोठे येथे संकल्प नेत्रदानाचा उपक्रम आयोजित केला होता. उपक्रमास उपस्थित डॉ. तन्वी खोसला यांनी नेत्रदानाचे महत्व व गरज यावर योग्य मार्गदर्शन केले. तसेच डॉ वैशाली जवादे यांनी नेत्रदान व देहदान कुठे व कसे करावे यासंदर्भात मार्गदर्शन केले. रंजना सडोलीकर मॅडम यांनी उपक्रमाचे कौतुक करत जास्तीत जास्त लोकांनी नेत्रदान करावे या संदर्भात मार्गदर्शन केले.१०५ नेतत्रदात्यांनी यावेळी मारणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला त्यासाठी रीतसर ऑनलाईन व ऑफलाईन अर्ज भरून सर्व फॉमलिटी पूर्ण केल्या.

आजूबाजूच्या परीसराची ओळख करून देणारे, आपल्याला जगाशी जोडणारे ,आत्मविश्वास वाढवणारे आपले डोळे.....डोळे आहे तर जग आहे असे म्हणणारे आपण....स्वतःच्या डोळ्याने पाहिल्याशिवाय विश्वास ठेवणार नाही असे म्हणणारे आपण...जाताना काहीच घेऊन जाऊ शकत नसलो तरी काहीतरी देऊन जाणार ज्याने की अपरिचित व्यक्तींचे अंधकारमय आयुष्य उजळूण निघेल असा मनाचा निर्धार करून नेत्रदानाचा संकल्प केला.

खूप दिवसापूर्वी नेत्रदान करावे असा विचार फक्त मनात घोळत राहत होता पण आज दिशा व्यासपीठामार्फत तो संकल्प पूर्ण झाला याचा आनंद नेत्रदात्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता आणि याचे मनोमन समाधान वाटते असे व्यासपीठाच्या संस्थापक, अध्यक्ष निलम आंधळे यांनी सांगितले. उपक्रमास आवर्जून उपस्थित असणारे कामोठे कॉलनी फोरम चे अध्यक्ष मंगेश आढाव यांनी उपक्रमचे कौतुक केले तसेच निरव नंदोला, प्रशांत कुंभार, अमित गुटुकडे, राहुल शिंदे, संगिता राऊत,जयश्री झा उपस्थित होते संस्थापक निलम आंधळे यांच्या मार्गदर्शनाखाली ख़ुशी सावर्डेकर व मनिषा कोचळे यांच्या सहकार्याने हा उपक्रम कामोठे येथे यशस्वीरीत्या पार पडला.

# वसंतराव नाईक महाविद्यालयात लसीकरण संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

म्हसळा येथील बॅरिस्टर ए.आर. अंतुले यांनी स्थापित केलेल्या कोकण उन्नती मित्र मंडळ मुंबई या संस्थेच्या वसंतराव नाईक कला, वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए.आर. अंतुले विज्ञान महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य व उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत राज्यातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे १००% लसीकरण करून महाविद्यालय पूर्ण क्षमतेने सुरु करण्याच्या हेतूने 'मिशन युवा स्वास्थ अभियान' हाती घेतले आहे. हे अभियान २५ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत पार पडणार असून मंगळवार दि.२६ ऑक्टोबर २०२१ रोजी म्हसळा येथील वसंतराव नाईक कला,वाणिज्य महाविद्यालय आणि बॅरिस्टर ए.आर. अंतुले विज्ञान महाविद्यालयातील ज्या विद्यार्थ्यांचे लसीकरण बाकी आहे,ज्यांनी एकही डोस घेतलेला नाही अश्या विद्यार्थ्यांची वर्गवाही नोंदणी करून मंगळवार दि.२६ ऑक्टोबर २०२१ रोजी वसंतराव नाईक महाविद्यालयात सकाळी ठीक १०.०० वाजता कोव्हीसिल्ड चा डोस देण्यात आला.

तसेच महाविद्यालयातील १८ वर्षावरील विद्यार्थ्यांनी अजूनपर्यंत एकही डोस घेतलेला नाही. त्या सर्व विद्यार्थ्यांची माहिती गोळा करून २ नोव्हेंबर २०२१ पर्यंत संपूर्ण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी लसीकरण करावे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी पहिला डोस पूर्ण केला आहे. व दुसऱ्या डोस चा कालावधी असेल अश्या सर्व विद्यार्थ्यांनी स्वतः पुढे येऊन लसीकरण करावे असे आवाहन महाविद्यालयाचे विश्वस्त सचिव प्रतिनिधी फजल हलदे, म्हसळा तहसीलदार समीर घारे यांनी यावेळी आलेल्या सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना केले. पुढे त्यांनी सांगितले की, या अभियानाद्वारे सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कोरोनापासूनचे संरक्षण मिळणार असल्याने आगामी काळात त्यांच्या शिक्षणात खंड पडणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त केली.

सदर लसीकरण मोहीम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राचार्य, शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांनी व महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभाग,त्याच बरोबर डॉ. प्रियांका देशमुख, डॉ. नेहा पाटिल, राजेश्री काणेकर, जे. एन. महाडिक, सागर सायगावकर, गीतांजली पाटिल, रीना धनावडे, कविता गढरी, सोनाली काळोखे, चंद्रकला पांडव, सुविधा म्हशीलकर, रुपाली सावतकर, मंजिरी रणदिवे, रमीला रेवाले, स्वेता अंबवले आदि मान्यवर उपस्थित होते.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## खारेपाटातील अन्यायकारक वाढीव पाणी पट्टीची नागरिकांनी केली होळी

धारकांच्या वार्षिक पाणीपट्टीत अन्यायकारक अशी वाढ केली आहे पाणीपुरवठ्यात कोणत्याही प्रकारची सुधारणा न करता जूनी बाराशे रुपये पाणीपट्टी जवळ जवळ दुपटीने म्हणजेच दोन हजार दोनशे रुपये इतकी वाढ करण्याचा जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आलेल्या पाणीपट्टी दरवाढीविरोधात पेण खारेपाटाच्या नागरिकांमध्ये प्रचंड संताप व नाराजी आहे. दिवाळीपर्यंत योग्य तो तोडगा न काढल्यास याही पेक्षा तीव्र आंदोलन खारेपाट विकास संकल्प संघटनेच्या माध्यमातून केले जाईल असे अध्यक्ष प्रकाश माळी यांनी सांगितले.

## उल्हासनगरमध्ये मोठी राजकीय उलथापालथ

टिकवलं आहे. काही वर्षांपूर्वी ते शिवसेनेसोबत होते. त्यानंतर भाजपसोबत घरोबा करून आघाडी स्थापन केली होती. आता त्यांनी थेट राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्या राष्ट्रवादी प्रवेशामुळं उल्हासनगरमधील राजकीय गणिते बदलणार आहेत.

## मंत्री गुलाबराव पाटील यांचा रायगड जिल्हा दौरा

माणगावकडे प्रयाण. सकाळी ११.०० वा. महाड–माणगाव–पोलादपूर विधानसभा क्षेत्रातील पाणी पुरवठा योजना आढावा बैठकीस उपस्थिती. स्थळ : शासकीय विश्रामगृह, माणगाव. दुपारी १२.०० वा. माणगाव येथून मांडवा, अलिबागकडे प्रयाण. दुपारी २.०० वा. मांडवा, अलिबाग येथे आगमन व स्पीड बोटीने मुंबईकडे प्रयाण.

# माझी वसुंधरा अभियानांतर्गत श्रीवर्धन मध्ये पर्यावरण संवर्धन व स्वच्छता जनजागृतीपर सायकल रॅली संपन्न

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

माझी वसुंधरा अभियानांतर्गत श्रीवर्धन मध्ये पर्यावरण संवर्धन व स्वच्छता जनजागृतीपर सायकल रॅली चे आयोजन माझी वसुंधरा अभियान हे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्याबाबत शासनाने दि. १४ ऑक्टोबर २०२० च्या शासन निर्णयानुसार मान्यता दिलेली आहे.

पृथ्वी, वायू, जल, अग्नी,आणि आकाश या निसर्गातील पंचतत्वांचे गुणवत्तापूर्ण संरक्षण व संवर्धन करण्यासाठी विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी या अभियानांतर्गत करण्यात येत आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार व मुख्याधिकारी श्रीवर्धन नगरपरिषद यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २७ ऑक्टोबर २०२१ रोजी सकाळी ७.३० वाजता श्रीवर्धन नागरपरिषदेमार्फत सायकल रॅली चे आयोजन करण्यात आले.

या सायकल रॅलीमध्ये पर्यावरण संरक्षण व संवर्धन, प्लास्टिक मुक्त शहर, कचरा मुक्त शहर, प्रदूषण मुक्त शहर या बाबत जनजागृती करण्यात आली. तसेच माझी वसुंधरा अभियानांतर्गत सामुदायिक शपथ घेण्यात आली.

सायकल रॅली ची सुरुवात श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालयापासून करण्यात आली व पुढे छत्रपती शिवाजी महाराज चौक, मार्केट, प्रभू आळी, नारायण पाखाडी , गंधरे नाका, विठ्ठल आली, जीवनेश्वर कुंड, जीवना बंदर, महेश्वर पाखाडी , ओजाले पाखाडी, केलस्कर पाखाडी, सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन समुद्र किनारा, टिळक रोड मार्गे श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालय असा प्रवास करण्यात आला. शेवट श्रीवर्धन नगरपरिषद कार्यालय येथे करण्यात आला. या सायकल रॅली मध्ये एकूण ५५ सायकलस्वारांनी सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वी पार पाडला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू–२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई–४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल–४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स–२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा–पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## लहान मुलांच्या भांडणावरुन दोन कुटुंबात तुंबळ हाणामारी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लहान मुलांच्या भांडणावरुन शेजारी शेजारी राहणाऱ्या दोन कुटुंबामध्ये तुंबळ हाणामारी झाल्याची घटना करावे गावात घडली. या हाणामारीत दोन्ही कुटुंबातील चार ते पाच जण जखमी झाले आहेत. या हाणामारीच्या घटनेनंतर एनआरआय पोलिसांनी दोन्ही कुटुंबातील ७ सदस्यांविरोधात परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

करावे गाव सेक्टर-३६ मध्ये अशा जाधव ही महिला कुटुंबासह राहण्यास असून तिच्या शेजारीच कविता बनसोडे ही देखील कुटुंबासह रहाण्यास आहे. गत शनिवारी आशा व कविता या दोघांच्या मुलांमध्ये खेळण्यावरून भांडण झाले होते. यावरुन कविता व आशा या दोघींमध्ये सायंकाळी बाचाबाची झाली होती. मात्र त्यांनी सदरचा वाद मिटविला होता. त्यानंतर दुसऱ्या दिवशी सायंकाळी आशा जाधव ही आदल्या दिवशी झालेल्या भांडणाची माहिती कविता बनसोडेच्या आईला सांगण्यासाठी तिच्या घरी गेली होती. यावेळी त्यांच्यामध्ये पुन्हा वाद होऊन शिवीगाळ व भांडण झाले. त्यानंतर या दोघींमध्ये हाणामारी सुरु झाल्यानंतर दोन्ही कुटुंबातील इतर सदस्यांनी सहभाग घेतला. त्यानंतर या दोन्ही कुटुंबामध्ये तुंबळ हाणामारी झाली. या हाणामारीत दोन्ही कुटुंबातील सदस्यांनी हाताबुक्क्यांने व लाकडी काठीने एकमेकांना मारहाण केल्याने दोन्ही कुटुंबातील ४ ते ५ जण जखमी झाले. त्यानंतर या दोन्ही कुटुंबियांनी एनआरआय पोलीस ठाण्यात एकमेकांविरोधात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी दोन्ही कुटुंबातील कविता बनसोडे, वैशाली खैरनार, उज्वला उबाळे, सुभाष तायडे त्याचप्रमाणे आशा जाधव, शालीकराम जाधव, शेषराव साळवे या सात जणांविरोधात परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.

## आमडोशी तेथील श्री समर्थ कृपा बचत गटाचा रांगोळी व्यवसाय

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

रोहा तालुक्यातील आमडोशी येथील श्री. समर्थ बचत गटाचा विविध सण उत्सवासाठी नेहमी व्यवसाय सुरु असतो रक्षाबंधन साठी राखी बनवणे, लग्न समारंभ यासाठी पापड, लोणचे,विविध वस्तू,कोरोना काळापासून मास्क बनवून विविध संस्थेला विक्री करणे असे विविध उपक्रम या श्री समर्थ कृपा बचत गटाचा उपक्रम वर्षभर सुरु असतो याचप्रमाणे सद्या दिवाळी साठी लागणारे विविध प्रकारच्या कलरच्या रांगोळी बनवून त्या विक्री साठी उपलब्ध आहेत.

रोहा तालुक्यातील आमडोशी येथील श्री समर्थ कृपा संयम साहय्यता बचत गटाच्या विविध प्रकारच्या व्यवसायामुळे मागील वर्षी या बचत गटाचा रायगड जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला आहे. यामुळे रोहा तालुक्यातील इतर बचत गटांनी त्यांचा आदर्श घेतला पाहिजे. या विविध व्यवसायासाठी आमडोशी येथील श्री समर्थ कृपा बचत गटाचाअध्यक्षा, संपदा जांबेकर,उपाध्यक्षा रसिका गोळे,सचिव दिक्षीता जांबेकर.सिआर पी दीपाली गोळे,बँक सखी वर्षा जांबेकर,अपर्णा जांबेकर ,वृषाली जांबेकर ,साधना जाधव, रोहिणी गोळे, कविता जांबेकर,पूजा जाधव, शकुंतला जांबेकर, व बचत गटाचे सर्व सदस्य विविध स्थरावर उपक्रम राबवण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत.

# स्व.लक्ष्मणशेठ पाटील व स्वर्गीय अविनाश म्हात्रे- पाटील यांच्या स्मरणार्थ 'नेत्र तपासणी शिबीर व मोफत चष्मे वाटप

**दै.रायगड नगरी । पनवेल**



स्वर्गीय लक्ष्मणशेठ पाटील व स्वर्गीय अविनाश म्हात्रे- पाटील यांच्या स्मरणार्थ लक्ष्मी चॅरीटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'नेत्र तपासणी शिबीर व मोफत चष्मे वाटप' कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थितीत लाभली. या शिबीराला नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

नावडे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत स्वर्गीय लक्ष्मणशेठ पाटील व स्वर्गीय अविनाश म्हात्रे- पाटील यांच्या स्मरणार्थ लक्ष्मी चॅरीटेबल ट्रस्टच्यावतीने 'नेत्र तपासणी शिबीर व मोफत चष्मे वाटप' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच याशिबीरामध्ये अल्पदरात मोती बिंदु शास्त्रक्रिया करण्याची सोय उपलब्ध करण्यात आली होती. या कार्यक्रमाचे सचिन लक्ष्मणशेठ पाटील व नावडे ग्रामस्थ मंडळाच्यावतीने आयोजन करण्यात आले होते. या शिबीराला नागरीकांचा उदंड प्रतिसाद लाभला असून, ५५० हून अधिक नागरीकांची नेत्र तपासणी करण्यात आली तसेच सुमारे ४०० हून जास्त नागरीकांना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला सचिन लक्ष्मणशेठ पाटील, नारायण जोमा म्हात्रे, विष्णु जोमा म्हात्रे, शैलेश लक्ष्मणशेठ म्हात्रे, संतोष विष्णु म्हात्रे, रमेश विष्णु म्हात्रे, एकनाथ म्हात्रे, कुनाल अविनाश म्हात्रे, अनंता रामदास म्हात्रे, राजेश खानावाकर, प्रशांत म्हात्रे, पंकज म्हात्रे, धिरज म्हात्रे, अरुण गवळी, निलेश म्हात्रे, राजेश म्हात्रे, भालचंद्र खानावकर, मदन खानावकर, रवींद्र खानावकर, राम खानावकर, लक्ष्मण खानावकर, यशवंत ठाकूर, विनोद खानावकर, विशाल खानावकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी सांगितले की, लक्ष्मणशेठ पाटील यांनी समाजाच्या दृष्टीकोनातून आपल्याला जेजे देता येईल याचा प्रयत्न सातत्याने केला. लक्ष्मणशेठ पाटील व अविनाश यांच्या निधनाने दुःखातून बाहेर येत त्यांच्या परिवारातील सदस्यांनी त्यांचे अनुकरण करत समाजासाठी आपण काही केले पाहिजे या भावनेतून या कार्यक्रमाचे आयोजन केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. तसेच लक्ष्मणशेठ पाटील यांची समाजासाठी काम करण्याची प्रवृत्ती होती तीच प्रवृत्ती त्यांची पुढील पिढी तितक्याच समर्थपणाने चालवेल असा विश्वास व्यक्त केला.

# आदिवासी स्थलांतर रोखण्यासाठी जिल्ह्यातील पहिला पथदर्शी प्रकल्प

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**



रायगड जिल्ह्यात स्थलांतराचा मुद्दा गंभीर झालाय. जिल्ह्यातील आदिवासींचे कामासाठी परराज्यात व जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात स्थलांतर होते. मात्र कामाच्या ठिकाणी त्यांचे शोषण होते. शिवाय वेठबिगाऱ्या प्रमाणे वागवले जाते. यातून त्यांचे व मुलाबाळांचे आर्थिक, मानसिक व शैक्षणिक नुकसान होते. परिणामी जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबाचे स्थलांतर रोखण्यासाठी व त्यांची मुले शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून जिल्ह्यात विविध ठिकाणी 'बाहास माला सालंमा धाड' (बाबा मला शाळेत पाठवा) या पथनाट्य प्रयोगाचे सादरीकरण करण्यात येत आहे. एकात्मिक आदिवासी विकास विभाग प्रकल्प पेण विभागाच्या प्रकल्प अधिकारी शशिकला अहिरराव यांच्या सहकार्याने आणि सुधागड तालुका तहसीलदार दिलीप रायण्णावार यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात हा पथदर्शी उपक्रम राबविला जात आहे. आदिवासी समाजाची मुले आणि काही प्राथमिक शिक्षक हे पथनाट्य सादर करीत आहेत. या माध्यमातून अनेक स्थलांतरे रोखता आली आहेत.

तहसीलदार दिलीप रायण्णावार यांच्या संकल्पनेतून मागील वर्षी सुधागड तालुक्यात सर्वप्रथम या अभिनव उपक्रमास सुरुवात झाली. यावेळी सर्वजण स्वखर्चाने ठिकठिकाणी पथनाट्याचे सादरीकरण करत होते. त्यानंतर तत्कालीन जिल्हाधिकारी यांनी या उपक्रमाची दखल घेतली. आणि नुकतेच एकात्मिक आदिवासी विकास विभाग प्रकल्प पेण यांनी हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबविण्यासाठी पुढाकार घेतला व नियोजित १३ प्रयोगांसाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. आतापर्यंत माणगाव, रोहा, सुधागड, पेण, खालापूर तालुक्यात हे पथनाट्य सादर केले आहे. व अजूनही ३० ऑक्टोंबर पर्यंत प्रयोग करण्यात येणार आहेत.

या पथनाट्याचे लेखन सुधागड तालुक्यातील राजीप दर्यागाव शाळेचे शिक्षक राजू बांगारे यांनी केले आहे. तर दिग्दर्शन पाच्छापुर शाळेचे पदवीधर शिक्षक अनिल राणे यांनी केले आहे. बाहास माला सालंमा धाड या पथनाट्य गटाचे अध्यक्ष दत्ता वाघमारे व सचिव रोहिदास हिलम हे आहेत. तर नारायण हंबीर, दामू शिद, विशाल वाघमारे, महादू वारगुडे, ज्ञानेश्वर वारगुडे, कमलाकर शिंदे, मोरेश्वर कांबळे, सतिश खानेकर, जनार्दन भिलारे, दिपक दंत, बजरंग बेलोसे, कमलाकर तांडेल, राम संकाये,भगवान दंत व साई बांगारे इत्यादी कलाकार यामध्ये सहभागी आहेत.

या पथनाट्यात आदिवासी बांधवांच्या विविध समस्या त्यांच्याच भाषेत प्रभावीपणे मांडण्यात आल्या आहेत. त्यादूर करण्यासाठी शिक्षणाची किती गरज आहे हे आदिवासी बांधवांना पटवून देण्याचा प्रयत्न केला जातो. या पथनाट्याला आदिवासी बांधवांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. सादरीकरण होणाऱ्या तालुक्यातील तहसीलदार व एकात्मिक प्रकल्प विकास विभागाचे चांगले सहकार्य मिळत आहे. आदिवासी समाजामध्ये जनजागृती करण्यास मोलाचे कार्य हे पथनाट्य करत असल्याचा प्रतिक्रिया अनेक मान्यवर व्यक्तींनी दिल्या आहेत .

## अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणारा तरुण अटकेत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वाशीतील जुहूगावात राहणाऱ्या एका २३ वर्षीय तरुणाने वाशी परिसरात रहाणाऱ्या एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीला फुस लावून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना उघडकिस आली आहे. निलेश जाधव (२३)असे या तरुणाचे नाव असून वाशी पोलिसांनी त्याला विनयभंगासह बलात्कार व पोक्सो कलमाखाली अटक केली आहे.

या घटनेतील आरोपी निलेश जाधव हा तरुण जुहूगावात तर पीडित मुलगी वाशी परिसरात रहाण्यास आहे. या दोघांची पुर्वीपासून तोंडओळख असल्याने आरोपी निलेश याने पीडित मुलीला फुस लावून तिच्यासोबत प्रेमसंबध निर्माण केले. त्यानंतर त्याने पीडित मुलीसोबत मोबाईलवर चॅटींग करुन तिच्यासोबत अधिक जवळीक निर्माण केली. त्यानंतर त्याने पीडित मुलीला आपल्या घरामध्ये नेऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केले. त्यानंतर आरोपी निलेश याने पीडित मुलीसोबत फोनवरुन चॅटींगद्वारे तसेच तिचा पाठलाग करुन झाल्या प्रकाराची माहिती पोलिसांना अथवा घरी आई-वडिलांना सांगू नये यासाठी त्याने पीडित मुलीला धमकावण्यास सुरुवात केली. याबाबतची माहिती पीडित मुलीच्या आईला समजल्यानंतर तिने आपल्या मुलीला विश्वासात घेऊन तिच्याकडे विचारपुस केल्यानंतर पीडित मुलीने घडल्या प्रकाराची माहिती आपल्या आईला दिली. त्यानंतर पीडित मुलीच्या आईने वाशी पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी निलेश जाधव याच्या विरोधात गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.


अर्जदारातर्फे वकील
ॲड.विशाल अनंत मुंडकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. पनवेल यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज क्र.१०३४/२०२१

श्री.संदीप हिरामण नाईक
वय : ३६ वर्षे, धंदा :
रा.वसंत विहार, मु.पालीदेवद,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६ अर्जदार
विरुद्ध
जन्म व मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत पालीदेवद,
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाले

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, ज्यापेक्षा सदर अर्जदाराची आजी भिमाबाई रामा नाईक ह्या दि.०५/०८/१९६६ रोजी मौजे : पालीदेवद, ता.पनवेल येथे राहते घरी अल्पशा आजाराने मयत झाले आहेत. सदर अर्जदाराने सदर मयताची नोंद होणेकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो. यांचे न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदर अर्जदाराची आजी भिमाबाई रामा नाईक ह्या दि.०५/०८/१९६६ रोजी मौजे : पालीदेवद, ता.पनवेल हे वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे? हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याचे आत, त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात, आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू न्यायालय सदरहू अर्जदार यांचेकडून लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंदणी करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२७ ऑक्टोबर माहे सन २०२१ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्या.क.स्तर, पनवेल**



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, १) श्रीमती. निरा दत्तू डाकी, २) श्रीमती.सुषमा उमेश पाटील, ३) श्रीमती.रेशमा अनंत केणी, ४) श्री.राजू दत्तू डाकी, ५) श्री.संजय दत्तू डाकी सर्व रा.चिंचपाडा, ता.पनवेल, जि.रायगड यांना खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनींच्या मोबदल्यात साडेबावीस टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद केलेल्या शेतकऱ्यांकडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे अशिल श्री.संगम जनार्दन भगत रा.कळंबोली, नवी मुंबई, ता.पनवेल, जि.रायगड यांनी त्रिपक्षीय / हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**मौजे : वडघर, ता.पनवेल, जि.रायगड**

| नोड | प्लॉट नं. | सेक्टर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| पुष्पकनगर | १५९ | आर वन | ७0.00 चौ.मीटर |

वर वर्णन जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, अथवा कोणत्याही व्यक्तीचा वा संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्राकरचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदाराबरोबर ठरविलेला विकसिन करार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

ठिकाण : पनवेल
दिनांक : २७/१०/२०२१

**सही/-**
**ॲड.दिपक म. ठाकूर**
**गाळा नं.९, पवन अपार्टमेंट, न्यू कोर्ट बिल्डींगच्या बाजूला, अशोक बागेसमोर लोखंडीपाडा, पनवेल-४१०२०६**


# गरीब महिलांना साड्या वाटप होत असल्याचे सांगून फसवणूक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कामोठे परिसरातील सेक्टर ११ येथील एक महिला उडीद डाळ खरेदीकरण्यासाठी बाहेरील पडल्या होत्या. यावेळी अनोळखी इसमाने त्यांना थांबवत उभे एक शेठ गरीब महिलांना साड्या वाटणार आहे. त्यामुळे तुम्हीं अंगावरील सोने काढून द्या नाहीतर साडी मिळणार नाही. असे सांगत त्या महिलेच्या अंगावरील सोन्याचे दागिने काढून घेऊन पसार झाल्याची घटना कामोठे परिसरात घडली आहे. याबाबत त्या महिलेने कामोठे पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपीचा शोध सुरु केला आहे.

रस्त्यावर पायी जाणाऱ्या महिलांच्या फसवणुकीच्या घटना वाढत चालल्या आहेत. अश्या ठकबाजांनी नवनवीन युक्त्या वापरत पोलिसासमोर आव्हान निर्माण केले आहे. कामोठे परिसरात अशीच महिलांच्या बाबतीत फसवणुकीची घटना घडली आहे. सेक्टर ११ कामोठे येथे राहणारी महिला सकाळच्या सुमारास सहयाद्री सहकारी बँकेमध्ये पैसे ट्रान्सफरसाठी निघाली होती. यावेळी बँकेमधील काम संपल्यास ती महिला तिच्या घराकडे परत निघाली असता उडीद दाळ घेयाचे असल्याचे आठवले. यावेळी एक अनोळखी इसम जवळ आला. थोड्या उशिराने त्याचा साथीदार जवळ येऊन थांबायला. यावेळी त्या महिलेला अचानक आली यावेळी त्या दोघे जवळ आले आणि म्हणाले कि या परिसरात एक शेठ शेठ येणार आहे. तो शेठ येथील गरीब महिलांना साड्यांचे वाटप करणार आहे. मात्र ज्या महिलांच्या अंगावर दागिने आहेत. त्यांना साड्या मिळणार नाही असे सांगून त्या महिलेच्या गळ्यातील सुमारे साठ हजार रुपये किमतीचे दागिने काढून दोघे भामटे सोने घेऊन पसार झाले. यावेळी त्या महिलेची फसवणूक झाल्याचे लक्षात येताच कामोठे पोलीस ठाणे गाठत तक्रार दिली. त्यानुसार कामोठे पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल करीत अधिक तपास सुरु केला आहे.

## खांब येथे एनएएस प्रशिक्षणवर्ग संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे पं.समिती शिक्षण विभाग अंतर्गत तालुक्यातील पुगांव केंद्रातंर्गत एनएएस प्रशिक्षण वर्ग व शिक्षक परिषद प्रा.शाळा खांब येथे ता.२७ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आले.

पं.समिती गट शिक्षण अधिकारी सादूराम बांगारे यांच्या मार्गदर्शनाखाली व केंद्रप्रमुख रत्नाकर कनोजे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झालेल्या या प्रशिक्षणासाठी केंद्रप्रमुख रत्नाकर कनोजे व विषय तज्ञ सौ. तावडे यांनी तज्ञ प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले. तर या प्रशिक्षणात एनएएस परीक्षेचे स्वरूप, विद्यार्थी वर्गाची तयारी व याबाबत शिक्षकवर्गाची सुयोग्य भूमिका आदी बाबत मार्गदर्शन करण्यात आले.सदरची परीक्षा. ही इ.३ री,५ वी,८ वी व इ.१० वीच्या विद्यार्थी वर्गासाठी होणार असून शिक्षकवर्गानी या परीक्षेबाबत चांगली तयारी करून घेण्याचे अवाहन करण्यात आले आहे.या प्रशिक्षणासाठी पुगांव केंद्रातील मोठ्या संख्येने शिक्षक प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.


मा.पांडे साहेब यांचे कोर्टात
ॲड.शेखर खोपकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज क्र.११२७/२०२१
ने.ता.०१/१२/२०२१

श्री.दिनकर काळू नावडेकर
वय : ५१ वर्षे, धंदा : शेती
रा.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक ग्रामपंचायत मोर्बे
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे वडील काळू दिवाजी नावडेकर हे दि.०८/०७/१९७९ रोजी मौजे : मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तथापि अनावधानाने मयत काळू दिवाजी नावडेकर यांच्या मृत्यू घटनेची नोंद विहित मुदतीत संबंधित ग्रामपंचायत कार्यालयामध्ये करावयाचे राहून गेले आहे. सबब सदरील अर्ज अर्जदार यांनी मयत काळू दिवाजी नावडेकर यांच्या उशिरा मृत्यू घटनेची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. हे सर्व कळावे.

ही नोटीस आज रोजी दि.२७/१०/२०२१ माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**



मा.पांडे साहेब यांचे कोर्टात
ॲड.शेखर खोपकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
क्रि.चौ.अर्ज क्र.११२६/२०२१
ने.ता.०१/१२/२०२१

श्री.दिनकर काळू नावडेकर
वय : ५१ वर्षे, धंदा : शेती
रा.मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक ग्रामपंचायत मोर्बे
ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई भागुबाई काळू नावडेकर या दि.०७/१०/१९७२ रोजी मौजे : मोर्बे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. तथापि अनावधानाने मयत भागुबाई काळू नावडेकर यांच्या मृत्यू घटनेची नोंद विहित मुदतीत संबंधित ग्रामपंचायत कार्यालयामध्ये करावयाचे राहून गेले आहे. सबब सदरील अर्ज अर्जदार यांनी मयत भागुबाई काळू नावडेकर यांच्या उशिरा मृत्यू घटनेची नोंद करण्याचे आदेश होणेकरिता सदरचा अर्ज दाखल केला आहे.

सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. हे सर्व कळावे.

ही नोटीस आज रोजी दि.२७/१०/२०२१ माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/-** **क.लिपीक** **फौ.न्याया, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **फौ.न्याया, पनवेल**



मे.मुजावर साहेब
ॲड.एस.जी.पाटकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे न्यायालयात
स्पे.मु.नं.४२२/२०१२
नि.नं.२१/ड
ने.ता.१५/१२/२०२१

स्टेट बँक ऑफ इंडिया खांदा कॉलनी शाखा वादी
विरुद्ध
श्री.बशीर महम्मद देशमुख वगैरे
केएल ५, २४/५ सेक्टर २, कळंबोली,
ता.पनवेल ४१०२१८
आणि
विष्णू नगर पोलीस स्टेशन, मानपाडा, डोंबिवली प्रतिवादी

ज्याअर्थी या नोटीसमध्ये जाहिररित्या असे कळविण्यात येते की, स्टेट बँक ऑफ इंडिया कामोठे शाखा, यांनी श्री.बशीर महम्मद देशमुख वगैरे यांच्या विरोधात कर्जाच्या रक्कमेच्या वसुली करता सदरचा दावा दाखल केलेला आहे. त्याअर्थी त्या दावा संबंधीच्या महत्वाच्या प्रश्नांचे उत्तरे देवू शकतील अशा वकीलामार्फत अथवा स्वतः या न्यायालयात उपस्थित होण्यासाठी याद्वारे तुमच्यावर या जाहीर नोटीसद्वारे बजाविण्यात येत आहे आणि याद्वारे तुम्हाला असा आदेश देण्यात येत आहे की, दि.१५/१२/२०२१ रोजी तुमच्या बचावाचे निवेदन दाखल करावे व आवश्यक ते दस्तऐवज दाखल करावे.

तुम्हास नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या दिवशी उपस्थित राहण्यास कसूर केल्यास तुमच्या अनुपस्थितीत वादीचा दावा एकतर्फी निकाली केला जाईल त्याचा निर्णय केला जाईल.

आणखी अशी नोटीस देण्यात येत आहे की, वर नमूद केलेल्या तारखेस तुम्ही कोर्टात हजर न झाल्यास सदरचा दावा तुमच्या विरोधात एकतर्फी चालवून निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दि.२६ माहे १०/२०२१ रोजी माझ्या सहीने प्रसिद्ध केली.

**सही/-** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल** — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**

